SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION,

# JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL, LOHEGAON, PUNE

**TERM 1 EXAM (2024-25)**

**Class: VI** **Section: A** **Subject: Marathi**

**Date: 26/ 09/2024** **Total Marks: 80**

**Roll No. : ____** **Time: 3 Hours**

**General Instructions :**

i) **The Question Paper consists of Two sections- Reading and Comprehension Literature based questions and Grammar**

ii) **All questions are compulsory.**

iii) **Read the question carefully before attempting it.**

## विभाग अ - गुण ४०

**प्रश्न १अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **गुण -५**

बाबा आमटे, समाजात उपेक्षित लोकांसाठी निस्वार्थ सेवेसाठी ओळखले जाणारे सामाजिक कार्यकर्ते. बाबा आमटे, 26 डिसेंबर 1914 रोजी जन्मलेल्या मुरलीधर देविदास आमटे, हे महाराष्ट्रातील एका श्रीमंत कुटुंबातले होते. त्याचा जन्म विशेषाधिकारात झाला, कारण त्याचे वडील ब्रिटिश सरकारी अधिकारी होते. जेव्हा त्यांना कुष्ठरोगाने गंभीरपणे ग्रस्त असलेल्या माणसाचा सामना करावा लागला. त्या क्षणी, बाबा आमटे यांनी कुष्ठरोगाशी संबंधित सामाजिक कलंक नष्ट करण्यासाठी आणि पीडितांना सन्मानित जीवन देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले.या नवीन उद्दिष्टाने प्रेरित होऊन बाबा आमटे यांनी कुष्ठरुग्णांसाठी आश्रयस्थान म्हणून घर देण्यास सुरुवात केली. शाश्वत उपायाची गरज ओळखून, त्यांनी कलकत्ता स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिनमध्ये या रोगाला चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आणि त्याचा सामना करण्यासाठी वैद्यकीय प्रशिक्षण घेतले..1951 मध्ये, कुष्ठरोग आणि त्याचे सामाजिक परिणाम समजून घेऊन, त्यांनी आनंदवन, म्हणजे "जॉय ऑफ जॉय" ची स्थापना केली, कुष्ठरुग्णांसाठी स्वयंपूर्ण पुनर्वसन केंद्र. हे केंद्र केवळ वैद्यकीय सुविधा नव्हते तर करुणा, सन्मान आणि समावेशकतेच्या तत्त्वांवर बांधलेला समुदाय होता.बाबा आमटे यांना 1971 मध्ये सर्वात जुनी ओळख मिळाली जेव्हा त्यांना सामाजिक सेवेतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक पद्मश्री देण्यात आला.1986 मध्ये, भारत सरकारने बाबा आमटे यांना समाजातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल आदरांजली अर्पण करून, देशाचा दुसरा-सर्वोच्च नागरी पुरस्कार, पद्म विभूषण देऊन सन्मानित केले.

i) बाबा आमटे हे समाजात कशासाठी ओळखले जाणारे सामाजिक कार्यकर्ते आहेत ?

Ii ) बाबा आमटे यांचे वडील कोण होते?

iii) बाबा आमटे यांनी त्यांचे जीवन कशासाठी समर्पित केले ?

iv) 1951 मध्ये त्यांनी कशाची स्थापना केली ?

v) भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार कोणता ?

**ब ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **गुण -५**

स्वच्छता म्हणजे स्वच्छतेने जगण्याची सवय.स्वच्छता हा आपल्या जीवनातील एक महत्त्वाचा पैलू आहे.कारण स्वच्छतेने आपण जीवनातील अनेक समस्यांपासून मुक्त होऊ शकतो.स्वच्छतेचा अवलंब करूनच आपण आजार दूर करू शकतो. आपल्या घराव्यतिरिक्त आजूबाजूच्या स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. महात्मा गांधी म्हणाले होते - " स्वच्छता ही सेवा आहे."शरीराची स्वच्छता देखील आपल्यासाठी खूप महत्वाची आहे, जसे की दररोज अंघोळ करणे, स्वच्छ कपडे घालणे, दात घासणे, नखे कापणे इ. यासाठी आपण रोज सकाळी उठल्याबरोबर दात स्वच्छ केले पाहिजेत. स्वच्छ भारत अभियान - हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2 ऑक्टोबर 2014 रोजी महात्मा गांधींच्या 145 व्या जयंतीनिमित्त सुरू केलेले एक महत्त्वाचे अभियान आहे. नवी दिल्लीतील राजघाट येथून ही मोहीम सुरू करण्यात आली. प्लास्टिकचा वापर टाळावा. प्लॅस्टिकच्या बॅग्स मुळे पर्यावरणाला धोका आहे.निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि आजूबाजूचे वातावरण स्वच्छ ठेवण्यासाठी झाडे लावणे अत्यंत गरजेचे आहे.पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावावीत.

i) महात्मा गांधी हे स्वच्छते बद्दल काय म्हणाले आहे?
ii) स्वच्छता आपल्या जीवनातील एक महत्त्वाचा पैलू का आहे?
iii) 2 ऑक्टोबर2014 रोजी कोणते अभियान सुरू करण्यात आले?
iv) प्लास्टिकच्या बॅग मुळे कोणाला धोका आहे?
v) पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी आपण काय केले पाहिजे?

**व्याकरण -गुण २०**

**प्रश्न २. अ )पुढील वाक्यातील नाम ओळखा व लिहा.** **गुण ४**
i) कुत्रा हा प्रामाणिक प्राणी आहे.
ii) रेवा नेहमी खरे बोलते.
iii) मला क्रिकेट खेळायला फार आवडते.
iv) आम्ही उद्या गोव्याला जाणार आहे.

**ब) पुढील वाक्यातील सर्वनाम ओळखा व लिहा.** **गुण ४**
i) तो काल सकाळी पुण्यावरून आला.
ii) अनिता नेहमी मला अभ्यासात मदत करते .
iii) काल आम्ही चौपाटीला गेलो होतो.
iv) अजय नेहमी त्याचे मित्रा सोबत नियमित व्यायाम करतो.

**क) पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणतेही २)** **गुण ४**
i) चक्रावून जाणे -
ii) गहिवरून येणे -
iii) उलगडा होणे -

**प्रश्न ३. अ ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **गुण २**
i) सकाळ- ii) संगत- iii) प्राण - iv) पाऊस -

**ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **गुण २**
i) पुण्य x ii) स्वर्ग x iii) विचार x iv) जाग x

**क) खालील शब्दांचे लिंग बदला व लिहा.** **गुण २**
i) राजपुत्र - ii) हंस - iii) आली- iv) राणी-

**ड) खालील शब्दांचे वचन बदला व लिहा.** **गुण २**

i) किरण- ii) काटा - iii) मुल- iv) राजवाडा-

**<u>प्रश्न ४. अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .</u>** **गुण -५**

सावता माळी हे शेती करून पोट भरणारे एक भक्त होते. त्यांचा पांडुरंगावर व पांडुरंगाचा त्यांच्यावर खूपच लोभ होता. त्यांच्या शेतात गव्हाचे पीक घेत असत. एके वर्षी भरपूर पीकआले होते. त्यास सुमारास पंढरपूरकडे जाणारी वारकऱ्यांची दिंडी त्यांच्या शेतावरून जात असताना त्यांनी त्यांना थांबवून त्यांना भोजन घातले. सगळे भोजनाने खुश झाले. पण मनोमनी दुःख होतं. कारण त्या वारकऱ्यांच्या गावी दुष्काळाने पीक नष्ट झालेली होती. तेव्हा त्यांनी सावतामाळ्यांना विनंती केली की, आम्हाला थोडं धान्य द्या ना घरी न्यायला. सावता माळी यांनी बायकोला विचारले, तेव्हा बायको म्हणाली की " त्यांना धान्य वाटून सगळ धान्य संपले तर आपण वर्षभर काय खायचं " तेव्हा ते म्हणाले, " हे बघ, जर निर्जीव जमिनीत एक दाना पेरला तर पांडुरंग आपल्याला शेकडो दाने देतो. तर त्यांच्या जिवंत भक्ताच्या पोटात आपण दाणे पेरले तर तो आपल्याला उपाशी ठेवेल का? तेव्हा हे ऐकून सावता माळ्याच्या पत्नीच्या डोळ्यात पाणी आले.

i) संत सावतामाळी त्यांच्या शेतात कशाचे पीक घेत असत ?
ii) सावता माळी हे कोण होते ?
Iii)वारकरी कोठे जात होते ?
iv) वारकऱ्यांनी सावता माळी यांना कोणती विनंती केली ?
v) सावता माळी यांच्या पत्नीच्या डोळ्यात पाणी का आले ?

**ब ) खालील कविता वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **गुण -५**

सकाळच्या सूर्यकिरणांनी
आली एकदम जाग
खिडकीत होता पक्षी तो
म्हणतो कसा आता तरी नीट वाग.

मी म्हणालो, का रे बाबा
असं का म्हणालास की नीट वाग
तर म्हणतो कसा?
झाड नाही लावलं तर पाऊस पडेल कसा?

मिळेल का एखाद झाड,
माझ्या पिल्लांना नी मला
ऐकून मीच चक्रावलो,
खरंच एवढा विचार मी नव्हता केला

i) खिडकीत कोण बसला होता ?
ii) पक्षी कसा वागायला सांगत आहे ?
iii) झाड नाही लावले तर काय होईल ?
iv) " पक्षी " या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा.
v) कवितेत आलेले कोणतेही दोन यमक जुळणारे शब्द लिहा.

**विभाग ब - गुण ४०**

**प्रश्न ५. अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही ३ )** **गुण ३**

i) i ) सावतामाळीला कश्याच्या बिया दिल्या होत्या ?
ii ) टणटण गोविंदाला कशाची लाज वाटत असे ?
iii ) श्री कृष्णाने नारदाला कोठे जायला सांगितले ?
iv ) काट्याच्या कुंपणावर कोण होते ?

**ब ) रिकाम्या जागा भरा .** **गुण ३**

i ) देव त्याच्या समोर ---------- झाले .
ii ) तिकडे त्या पिल्लाची ---------- वाट पाहत होते .
iii ) नारदाची व राजपुत्राची ----------- झाली .

**क ) थोडक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही १)** **गुण ३**

i ) नारदाला संतसंगतीचा महिमा कोणी सांगितला व कसा ?
ii ) " धन्य तुझी भक्ती " असे राजा सावतामाळींना का म्हणाला ?

**ड )कोण कोणास म्हणाले ते लिहा** **गुण २**

i ) " तू अजिबात घाबरू नकोस "
ii ) " काय झाले पिल्ला ? तू चिंतेत का आहेस ? "

**पद्य**

**प्रश्न ६.अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा .** **गुण ३**

i ) पक्षाला झाड का हवं आहे ?
ii ) झाडे वेली केव्हा डोलू लागली ?
iii ) एक तरी काय लावायला हवं ?

**ब ) थोडक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही १ )** **गुण ३**

i ) झाडे लावण्याचे कोण कोणते फायदे आहेत ?
ii ) तुम्ही अनुभवलेल्या पावसाळ्यातील गमती जमती विषयी थोडक्यात लिहा .

**क ) जोड्या लावा .** **गुण ३**

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| i ) अंगणात | अ ) सगळ्यांना |
| ii ) हात | ब ) झाड |
| iii ) विनवणी | क ) जोडणे |

**प्रश्न ७.अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दात निबंध लिहा** . **गुण ८**

* माझा गाव ( नाव - तेथील लोक - व्यवसाय - असणाऱ्या सोयी - अभिमान )

**किंवा**

* पावसाळ्यातील एक दिवस ( एक दिवस - अचानक पाऊस - झालेली फजिती - वातावरणातील बदल - आनंद - गमती जमती )

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा . कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा . गुण ७**

* एक जंगल -दुष्काळ -एका झाडावर एक कावळा - त्याच्या तोंडात एक फळ -भुकेला कोल्हा - फळ मिळविण्यासाठी युक्ती - झाडाखाली - कावळ्याची स्तुती - तोंड उघडताच फळ खाली पडणे - कोल्हा आनंदी.

**किंवा**

*एक गुणी मुलगा - बिघडलेल्या मुलाची संगत - अभ्यासावर परिणाम - वडिलांचा ओरडा - उदाहरण - अंब्याची पेटी - सगळे आंबे सडणे – बोध

**क) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक ) गुण ५**

*दिवाळीच्या सुट्टीत तुमच्या घरी येण्यासाठी आमंत्रण देनारे पत्र तुमच्या मित्राला / मैत्रिणीला लिहा.

**किंवा**

* व्यायामाचे महत्त्व सांगणारे पत्र तुमच्या लहान भावाला / बहिणीला लिहून कळवा.